भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. २०५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०३/२०१७

१) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन जबर दुखापत करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक २०/०३/२०१७ चे १९.०० यातील आरोपी व फिर्यादी हे आई वडील व भाऊ असे नाते असुन एकाच घरी वेगवेगळया खोली मध्ये राहतात यातील आरोपी क्र. २ ने फिर्यादीस ईलेक्ट्रीक बिल अर्धा भरावा लागेल या कारणा वरुन झगडा भांडण सुरु असतांना आरोपी क्र. १ तिथे येवुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी देवुन फिर्यादी सोबत लांबा झोंबी केली असतांना आरोपी क्र. २ व ३ यांने पकडुन ठेवल्याने आरोपी क्र. १ ने फिर्यादीच्या डाव्या कानाचा भाग चावुन वेगळा करुन जबर दुखापत केल्याने फिर्यादी यशवंत मुरलीधर कावळे वय ३९ वर्ष, रा. भगतसिंग वार्ड टाकळी भंडारा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२५,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

२) पैश्याच्या वादावरुन भांडण व शिवीगाळ करुन मारहान करुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक २१/०३/२०१७ चे १२.०० यातील फिर्यादी व आरोपी यांच्यात पैश्याच्या वादावरुन भांडण झाले असतांना यातील आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन विटांच्या तुकडयाने कपाडावर, पाठीवर मारहान करुन जखमी केल्याने फिर्यादी प्रवीण सिताराम वाघमारे वय २४ वर्ष, रा. संत कबीर वार्ड भंडारा यांचे बयानावरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

३) जुन्या वादावरुन डोक्यावर लोखंडी डाईने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक २१/०३/२०१७ चे १६.०० यातील फिर्यादी अरवींद हरीदास ऊईके वय २० वर्ष, रा. पवनारा हा पवनारा बसस्टॉप वरुन पायी जात असतानां यातील आरोपीने जुन्या वादावरुन फिर्यादीचे डोक्यावर लोखंडी सलाख वाकविण्याची लोखंडी डाईने मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

४) डोक्यावर बासाच्या काठीने मारुन जखमी केले . :-

दिनांक २०/०३/२०१७ चे २२.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी शंकर मुलचंद बावने वय ३३ वर्ष, रा. प्लॉट नं. ३९ भवानी नगर पारडी नागपुर हा आपले साळयाच्या घरी पत्नी व मुलास भेटण्यास गेला असतांना यातील आरोपीने तु माझ्या घरी येवुन नको असे म्हणुन फिर्यादीचे डोक्यावर मध्यभागी बासाच्या काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

५) दारुचे नशेत फिनाईलची औषध प्राशन केल्याने औषधोपचार दरम्यान इसमाचा मृत्यु . :-

दिनांक १२/०३/२०१७ चे ०९.३० वा. दरम्यान यातील मृतक रामनाथ भवराज हतुलकर वय ३८ वर्ष रा. सितासावंगी याने दारुचे नशेत फिनाईलची औषध प्राशन करुन प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोउपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. मेश्राम पोस्टे गोबरवाही यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावने पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहे.

६) गळफास लावुन उपचारा दरम्यान वृध्दाचा मृत्यु . :-

दिनांक २७/०२/२०१७ चे १२.०० वा. दरम्यान यातील मृतक गोपालराव तुळशिराम हरडे वय ७५ वर्ष, रा. पदमा वार्ड पवनी हा आपले स्वत:चे घरी गळफास लावल्याने त्याचे नातेवाहीकांनी प्राथमीक आरोग्य केन्द्र अडयाळ येथे भरती केले व तेथील डॉक्टरने पुढील उपचारा करीता रेफर केल्याने त्यास गिलुकर हॉस्पीटल सक्करदरा नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मृतक हा दिनांक ०६/०३/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान डॉक्टरने तपासुन मृत घोषीत केल्याने पोस्टे सक्करदरा नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. चुटे पोस्टे पवनी यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी येथे कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

**७) एसटी चालकांच्या लापरवाहीने सायकल चालकास धडक देवुन गंभीर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २०/०३/२०१७ चे १९.४५ यातील फिर्यादी सुभाष हसाराम बडवाईक वय ५५ वर्ष, रा. खरबी याचा भाऊ हिरालाल मोतीराम बडवाईक वय ४२ वर्ष, रा. खरबी हा कामावरुन तुमसर येथुन सायकल ने घरी परत येत असतांना खरबी गावाजवळ यातील आरोपीने आपल्या ताब्यातील एसटी बस भरधाव वेगाने व लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन मागेहुन फिर्यादीच्या भावाच्या सायकल ला धडक मारुन गंभीर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेंपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २०/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ७९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०६, तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**पोउपनि.ए.व्ही. तुळजेवार**
**नियंत्रण कक्ष अधिकारी भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ७७६८८६९९७७**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.